ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# भारतीय पर्यटनाचा विकास आणि समस्या

**मोहन सखाराम कांबळे, Ph. D.**

*आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविदयालय, पुणे ३0*

**शोधनिबंधाचा गोषवारा**

**पर्यटनाची पार्श्वभूमी** – अतिप्राचीन काळापासून प्रवास ही मनुष्यप्राण्याची सहज प्रवृत्ती आहे. प्राचीन काळातील प्रवासाच्या पद्धती व संकल्पना या आजच्या काळातील प्रवास पद्धती व संकल्पना यापेक्षा वेगळया आहेत. प्राचीन काळी प्रवासाचा उद्‌देश नवीन प्रदेशाचा ‘ शोध घेणे, व्यापार करणे व धार्मिक स्थळांना भेट देणे हा होता. हे प्रवासी व व्यापारी विविध भूप्रदेश, देश व राज्यातून प्रवास करत असत. त्यामुळे विविध राज्यांच्या राजधान्या, ‘ शहरे, बंदरे, बाजारपेठांची केंद्रे, व्यापारी मार्ग यांचा त्यांच्याशी संबंध येत असे.

**भारतीय पर्यटनाचा इतिहास** – भारतीय पर्यटनाचा इतिहास हा हजारो वर्षे जुना आहे. हजारो वर्षापासून भारतीय उपखंडात लोक तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याकरीता एका ठिकाणाहून दुस–या फिरत आलेत. भारतीय ग्रंथातसुध्दा याचे पुरावे भेटतात ज्यात पंढरीचीवारी, कुंभमेळा यांचे संदर्भ वाचण्यास मिळतात.

**पर्यटन**– पर्यटन म्हणजे दैनंदिन प्रवासाव्यतिरिक्त किंवा कामाव्यतिरिक्त केलेला प्रवास.

**पर्यटन विकास** – कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच भविष्याचा वेध घेत या भूमिकेला अधिक महत्त्व प्राप्त व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संघटनेने “शाश्वत पर्यटन – विकासाचे साधन” असे घोषवाक्य निश्चित केले आहे. पयटन हा जगातील रसायने आणि इंधनानंतरचा तिस–या क्रमांकाचा मोठा व्यवसाय आहे. पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण होणा–या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांवर अनेकांचे उदरनिर्वाह अवलंबून आहेत. वाहतूक, हॉटेल्स, मनोरंजन आदी व्यवसायही पर्यटनाशी जोडले गेले आहेत. पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणा–या नागरीकांच्या जीवनमानातही बदल घडून येतो.

**पर्यटनाचे फायदे**– स्थानिक नागरिकांना रोजगाराची उपलब्धता होते, मनोरंजन होते, ताण विरहित जगता येते, समुहाबरोबर विचारांची देवाणघेवाण होते, त्या त्या प्रदेशातील लोकांचे राहणीमान व जीवनमान पाहता येते, शेतीच्या विविध पद्धती समजावून घेता येतात, समायोजन क्षमतेचा विकास

होतोपरकिय चलन मिळते.स्थानिक संस्कृतीची , परंपरा व खाद्यसंस्कृतीची माहिती मिळते, वैभवशाली इतिहासाची आळख होते.

**पर्यटन समस्या**– वाहतूकीच्या समस्येस सामोरे जावे लागते, प्रदुषणाची समस्या निर्माण होते, पाण्याचा अपव्यय होतो, अस्वच्छतेच्या समस्यस सामोरे जावे लागते,संसर्गजन्य रोगांची लागण, सुरक्षिततेचा अभाव. पर्यटकांची होणारी फसवेगिरी, स्थानिक पर्यटनाला बाधा निर्माण होतात, उपचार केंद्रांचा व तातडीच्या मदतकार्याचा अभाव.

**पर्यटन समस्येवरील उपाय** –पर्यटन स्थळांचे सौंदर्य आबाधित ठेवण्यासाठी काटेकोर अंमलबजावणी करणे, पर्यटन स्थळांची स्वच्छता राखणे, आपल्या व्यवसायामुळे नैसर्गिक साधन संपदेवर ताण पडणार नाही याकडे काळजीपूर्वक लक्ष दयावे,पर्यटकांच्या सुरक्षिततेला अधिक प्राधान्य दयावे, पर्यटन स्थळांची निर्मिती करणे, सोयी सुविधांना चालना देणे, परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याचे धोरण, पर्यटनासाठी प्रसार माध्यमे व जाहिरातींचा वापर, शक्य तेथे सौर उर्जा व विजेचा वापर करावा, पर्यावरणाचा –हास होणार नाही याची काळजी घ्यावी.

**महत्त्वाचे शब्द** – पर्यटन, विकास, पर्यटनाचे फायदे , पर्यटनाच्या समस्या, उपाययोजना.

**पर्यटनाची पार्श्वभूमी** – अतिप्राचीन काळापासून प्रवास ही मनुष्यप्राण्याची सहज प्रवृत्ती आहे. प्राचीन काळातील प्रवासाच्या पद्धती व संकल्पना या आजच्या काळातील प्रवास पद्धती व संकल्पना यापेक्षा वेगळया आहेत. प्राचीन काळी प्रवासाचा उद्देश नवीन प्रदेशाचा ' शोध घेणे, व्यापार करणे व धार्मिक स्थळांना भेट देणे हा होता. हे प्रवासी व व्यापारी विविध भूप्रदेश, देश व राज्यातून प्रवास करत असत. त्यामुळे विविध राज्यांच्या राजधान्या, ' शहरे, बंदरे, बाजारपेठांची केंद्रे, व्यापारी मार्ग यांचा त्यांच्याशी संबंध येत असे. हा प्रवास व व्यापार यांतून विविध मानवी समूह, संस्कृती यांची परस्पर ओळख झाली. अनेक गोष्टींची देवाणघेवाण झाली. एकमेकांच्या समाजजीवनाचे आकलन झाले.प्रवास व पर्यटनाच्या वाढीसाठी या बाबी अनुकूल ठरल्या. मध्ययुगात व्यापा–याच्या प्रवास पद्धतीत बदल झाले. आनंद मिळविण्यासाठी, मनोरंजनासाठी प्रवास ही संकल्पना प्रथम युरोपातील रोमन लोकांनी रुजवली. रवमन साम्राज्याच्या काळात तेथील लोक इजिप्तमधील पिरॅमिड, ग्रीसमधील अथेन्स व स्मार्टा या नगरांची भव्य नगररचना, तेथील देव देवतांची मंदिरे, मुर्ती, तेथील क्रिडांगणे पाहण्यासाठी जात. पुढे युरोपमधील पुनरुज्जीवनामुळे जगभरातील वसाहतींचा व साम्राज्याचा विस्तार, औद्योगिक क्रांती व यातून युरोपमध्ये सुरु झालेला संपत्तीचा ओघ यामुळे तेथे पर्यट नही श्रीमंतांची मक्तेदारी न राहता मध्यमवर्गसुद्धा पर्यटनात सहभागी झाला. त्यात धर्म प्रसारक, विद्वान, लेखक, कवी व व्यापारी यांचा समावेश होता.

**भारतीय पर्यटनाचा इतिहास**

भारतीय पर्यटनाचा इतिहास हा हजारो वर्षे जुना आहे. हजारो वर्षापासून भारतीय उपखंडात लोक तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याकरीता एका ठिकाणाहून दुस–या फिरत आलेत. भारतीय ग्रंथातसुध्दा याचे पुरावे भेटतात ज्यात पंढरीचीवारी, कुंभमेळा यांचे संदर्भ वाचण्यास मिळतात. तसेच इंग्रजांनी जेंव्हा भारतावर राज्य केले तेंव्हा त्यांच्या दोन राजधानी असत, हिवाळी राजधानी आणि उन्हाळी राजधानी. इंग्रज

उन्हाळयात महाबळेश्वरला, शिमला, कश्मीर, उटी म्हैसूर अशा ठिकाणी राहणे पसंत करत. इंग्रज हे राजकर्ते होते आणि त्यांच्याकडे कामासाठी किंवा निगराणीसाठी भारतातील काही राजे महाराजे किंवा अधिकारी होते, ज्यांना कामानिमित्ताने इंग्रजाच्या माघे त्या त्या ठिकाणी जावे लागे. भारताला स्वातंत्र्य मिळाले इंग्रज हा देश सोडून गेले पण त्याच्यामागे येथील श्रीमंत घराणे आणि राजे महाराजे यांना मात्र अशा फिरण्याची चटक लागली आणि स्वतंत्र्य भारतात फिरण्याची वेगवेगळे प्रदेश बघण्याची इच्छा तर प्रत्येक सामान्य माणसाला होती ती या लोकांना बघून उदयास आली आणि अशाप्रकारे भारतात पर्यटनाची सुरवात झाली.

**पर्यटन**–

- पर्यटन म्हणजे दैनंदिन प्रवासाव्यतिरिक्त किंवा कामाव्यतिरिक्त केलेला प्रवास.
- कामातून सुट्टी मिळाली की त्यानुसार आनंद, मौज करीत निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी केलेले नियोजनबद्ध केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.
- एका व्यक्तीने कंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

**पर्यटन विकास** –

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच भविष्याचा वेध घेत या भूमिकेला अधिक महत्त्व प्राप्त व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संघटनेने "शाश्वत पर्यटन – विकासाचे साधन" असे घोषवाक्य निश्चित केले आहे. पर्यटन हा जगातील रसायने आणि इंधनानंतरचा तिस–या कमांकाचा मोठा व्यवसाय आहे. पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण होणा–या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांवर अनेकांचे उदरनिर्वाह अवलंबून आहेत. वाहतूक, हॉटेल्स, मनोरंजन आदी व्यवसायही पर्यटनाशी जोडले गेले आहेत. पर्यटन व्यवसायामुळे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विषयक विकास होण्याबरोबरच पर्यटनस्थळ परिसरात राहणा–या नागरीकांच्या जीवनमानातही बदल घडून येतो. पर्यटकाला आवश्यक असणारी निवास, भोजन, वाहतूक, माहिती, मनोरंजन आदी व्यवस्थेसोबतच त्या भागातील उत्पादनांनादेखील मागणी निर्माण होते. सांस्कृतिक आदानप्रदानाच्या माध्यमातून नागरिकांना एकमेकांशी जोडण्याचे कामदेखील पर्यटनाच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे पर्यटन विकासात नागरिकांचा जेवढा सहभाग वाढेल, तेवढेच त्याभागातील अर्थकारणाला गती मिळेल. पर्यटन विकासाबाबत कल्पना मांडताना त्याभागातील खाद्यसंस्कृती, पारंपारिक कला, साहित्य, लोकजीवन, निसर्ग याचा फारसा विचार केला जात नाही. पर्यटकांसाठी चांगल्यासुविधांएवढेच त्यांना नव्या जगाचे दर्शन होणे आणि रोजच्या जीवनापेक्षा नवा अनुभव मिळणे महत्त्वाचे असते. पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या परंपरेच्या खुणा याचसाठी खास करून जपल्या आहेत आणि त्याचे मार्केटींग उत्तमरित्या केले जाते. जागतिक पर्यटन संघटनेचे महासचिव ताबेल रिफाई यांचा पर्यटकांना सुंदर संदेश " निसर्ग, संस्कृती आणि यजमान यांचा सन्मान करा, तुम्ही अधिक चांगल्या विश्वाचे दूत बनू शकता. ही भावना पर्यटकांपुरती मर्यादित न राहता

पर्यटनस्थळ परिसरातील नागरिकांनादेखील स्वागत संन्मान आणि सुविधा या तीन बाबी लक्षात घेतल्यास पर्यटनाच्या माध्यमातून अपेक्षित विकास शक्य आहे.”

**पर्यटनाचे फायदे**

- स्थानिक नागरिकांना रोजगाराची उपलब्धता होते.
- आर्थिक सुबत्ता येते.
- वेळेचा योग्य वापर.
- मनोरंजन होते.
- ताण विरहित जगता येते.
- स्वतःच्या क्षमतांची जाणिव होते.
- आरोग्यासाठी लाभदायक.
- समुहाबरोबर विचारांची देवाणघेवाण होते.
- औषधी वनस्पतींचा अभ्यास होतो.
- जैव विविधता अनुभवता येते.
- त्या त्या प्रदेशातील लोकांचे राहणीमान व जीवनमान पाहता येते.
- शेतीच्या विविध पद्धती समजावून घेता येतात.
- समायोजन क्षमतेचा विकास होतो.
- नेतृत्व क्षमतेचा विकास होतो.
- नियोजनात सक्षम होण्याकडे भर दिला जातो.
- परकिय चलन मिळते.
- स्थानिक संस्कृतीची माहिती मिळते.
- वैभवशाली इतिहासाची ओळख होते.
- परंपरा व खाद्यसंस्कृतीची माहिती होते.

**पर्यटन समस्या**

- वाहतूकीच्या समस्येस सामोरे जावे लागते.
- राहण्यासंदर्भातील समस्या.
- प्रदुषणाची समस्या निर्माण होते.
- पाण्याचा अपव्यय होतो.
- अस्वच्छतेच्या समस्या.

- संसर्गजन्य रोगांची लागण.
- सुरक्षिततेचा अभाव.
- पर्यटकांची होणारी फसवेगिरी.
- स्थानिक पर्यटनाला बाधा निर्माण होतात.
- प्राण्यांच्या सुरक्षितेची समस्या.
- उपचार केंद्रांचा व तातडीच्या मदतकार्याचा अभाव.
- नैसर्गिक आपत्तीची समस्या.
- व्यसनाधिनतेची समस्या.

**पर्यटन समस्येवरील उपाय –**

- पर्यटन स्थळांचे सौंदर्य आबाधित ठेवण्यासाठी काटेकोर अंमलबजावणी करणे.
- पर्यटन स्थळांची स्वच्छता राखणे.
- आपल्या व्यवसायामुळे नैसर्गिक साधन संपदेवर ताण पडणार नाही याकडे काळजीपूर्वक लक्ष दयावे.
- पर्यटकांच्या सुरक्षिततेला अधिक प्राधान्य दयावे.
- पक्षी व प्राण्यांच्या संरक्षणाकडे लक्ष दयावे.
- छोटया उद्‌योगांना चालना दयावी.
- उपचार केंद्रांची उपलब्धता वाढवावी.
- परवडणा–या दरात उत्तम निवासाची सोय.
- पर्यटन स्थळांची निर्मिती करणे.
- सोयी सुविधांना चालना देणे.
- स्थानिक ठिकाणांच्या विकासास प्राधान्य.
- परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याचे धोरण.
- पर्यटनासाठी प्रसार माध्यमे व जाहिरातींचा वापर.
- शक्य तेथे सौर उर्जा व विजेचा वापर करावा.
- पर्यावरणाचा –हास होणार नाही याचो काळजी घ्यावी.

## संदर्भ–

*https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AA%E0%A4%B0%E0%A5%8D%E0%A4%AF%E0%A4%9F%E0%A4%A8*
https://mr.wikipedia.org/s/2uuo
*http://www.manogat.com/node/139*
*http://mr.vikaspedia.in/education/apala-maharashtra/92e93993e93093e93794d91f94d930-91593f93294d932947/92a93094d92f91f928-90692393f-93593f91593e938*
*https://www.loksatta.com/thatsit-news/knowledge-about-indian-tourism-976647/*
*http://www.lokmat.com/sakhi/go-walk/*